# मोरारजींच्या 'त्या' भूमिकेबाबत जनहित याचिका

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

'भारतरत्न व पद्म पुरस्कार मिळवण्यासाठी काही जणांकडून सत्ताधीशांचे लांगुलचालन केले जाते. शिवाय असे पुरस्कार मिळालेल्या व्यक्ती आपल्या नावापुढे पदवी म्हणून ती मिरवतात. केंद्र सरकारने १९५४मध्ये याविषयीचा घेतलेला निर्णय मला पटला नव्हता', अशी वादग्रस्त वक्तव्ये माजी पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी 'द स्टोरी ऑफ माय लाइफ' या आत्मचरित्रात केला होता. शिवाय त्यांच्या पंतप्रधान पदाच्या कार्यकाळात म्हणजे १९७७ ते १९८० दरम्यान त्यांनी भारतरत्न व पद्म पुरस्कार देण्याची प्रथाही बंद ठेवली होती. असे करून त्यांनी राज्यघटनेचे उल्लंघन केले नाही का, असा प्रश्न उपस्थित करत अॅड. धनंजय जगताप यांनी जनहित याचिका केली आहे. खुद्द मोरारजींना केंद्र सरकारने १९९१मध्ये भारतरत्न बहाल केले होते, असेही याचिकादारांनी निदर्शनास आणले आहे. तथापि, 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य असल्याने मोरारजी यांनी आत्मचरित्रात त्यांचे व्यक्तिगत मत मांडले, त्यात गैर काय', असे प्राथमिक मत व्यक्त करून मुख्य न्यायमूर्ती मंजुला चेल्लुर व न्या. गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठाने नियमित तारखेलाच सुनावणी घेऊ, असे स्पष्ट केले.

# बीकेसीत पार्किंगप्रश्न गंभीर

## 'एमएमआरडीए'चे चार पार्किंग बंद



**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

वांद्रे कुर्ला संकुलातील (बीकेसी) चार भूखंडावरील पार्किंग सुविधा 'एमएमआरडीए'ने कोणतेही कारण न देता बंद केल्याने वाहनचालकांमध्ये तीव्र नाराज पसरली आहे. या प्लॉटवरील पार्किंग कंत्राटाची मुदत संपल्याने नव्याने निविदा काढली जात असून त्यामुळे पार्किंग बंद ठेवल्याचे स्पष्टीकरण एमएमआरडीने दिले आहे. संकुलातील अन्य पार्किंगचा लाभ घेण्याचेही सुचवले आहे.

गेल्या काही वर्षांपासून एमएमआरडीएने संकुलातील चार भूखंडांवर सशुल्क पार्किंगची सोय उपलब्ध करून दिली आहे. पण गेल्या काही दिवसांपासून ही सुविधा बंद केली आहे. या भूखंडांचे फाटक बंद करून तिथे सुरक्षारक्षकही तैनात केले आहेत. वाहनचालकांच्या आंदोलनानंतर काही दिवस पुन्हा पार्किंग उपलब्ध करून दिले असले, तरी पुन्हा बंदी घालण्यात आली आहे. विविध खासगी कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी यासंदर्भात एमएमआरडीएकडे लेखी तक्रार केली आहे.

एमएमआरडीएच्या या चार भूखंडांवर फक्त ३०० वाहनांसाठी पार्किंगची सोय होती. मात्र काही कार्यालयात एक हजाराहून अधिक कर्मचारी काम असून बहुसंख्य कर्मचाऱ्यांकडे वाहने असतील, तर ही जागा कशी पुरणार, असा वाहनचालकांचा सवाल आहे. खाजगी पार्किंगचे शुल्क न परवडणारे आहे, अशीही तक्रार आहे. आधीच संकुलात पार्किंगचा प्रश्न गहन होत असताना, या चार ठिकाणचे पार्किंग बंद केल्यामुळे संकुलात आणखीन गोंधळाची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

### कार्यालयांचीही जबाबदारी

मुळात हे प्लॉट एमएमआरडीएने व्यावसायिक वापरासाठी ठेवले असून खरेदीदार मिळाल्यावर ते विकण्यात येणार आहेत. या प्लॉटवर पार्किंग ठेवणे बंधनकारक नसतानाही आम्ही सेवा देत आहोत. संकुलात अनेक ठिकाणी खासगी जागांवर जवळपास दोन हजार वाहनांच्या पार्किंगची सोय आहे. परंतु त्याचा लाभ घेत नाहीत. शिवाय, खासगी कार्यालयांनी इमारतीजवळ वाहनांची सोय करणे अभिप्रेत आहे, अशी भूमिका एमएमआरडीएने मांडली.

---

GODFREY PHILLIPS INDIA LIMITED
CIN: L16004MH1936PLC008587:
website:www.godfreyphillips.com; email: isc-gpi@modi.com

**Extract of Standalone Unaudited Financial Results for the Quarter and Nine Months ended 31st December, 2016**

(Rs. in lakhs)

| Sl. No. | Particulars | Quarter ended 31.12.2016 | Nine Months ended 31.12.2016 | Quarter ended 31.12.2015 |
|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operations | 109065 | 305175 | 98222 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 5558 | 11418 | 1489 |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 5558 | 11418 | 1489 |
| 4 | Net Profit/(Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 3844 | 8052 | 1250 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 3776 | 7850 | 1111 |
| 6 | Equity Share Capital | 1040 | 1040 | 1040 |
| 7 | Basic and Diluted Earnings per Share (of Rs.2 each) (Rs.) | 7.40 | 15.49 | 2.40 |

Notes :

1. The above is an extract of the detailed format of Statement of Standalone Unaudited Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The detailed financial results and this extract were reviewed by the Audit Committee and approved at the meeting of the Board of Directors of the Company at the meeting held on February 2, 2017. The full format of the Statement of Standalone Unaudited Financial Results are available on the Company's website (www.godfreyphillips.com) and on the websites of National Stock Exchange of India Limited (www.nseindia.com) and BSE Limited (www.bseindia.com).
2. A Limited Review as required under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 has been completed on the detailed financial results for the Quarter and Nine Months ended 31st December, 2016 and the Limited Review Report of the Auditors has been filed with the Stock Exchanges. This Report does not have any impact on the 'Results and Notes' for the quarter and nine months ended 31st December, 2016 which needs to be explained.

**Registered Office:** 'Macropolo Building', Ground Floor, Next to Kala Chowky Post Office, Dr. Babasaheb Ambedkar Road, Lalbaug, Mumbai - 400 033.

**For and on behalf of the Board**
**Sd/-**
**(K.K. Modi)**
**Managing Director**

**Place: New Delhi**
**Dated: 2nd February, 2017**


Mirror GIRLS SOCCER LEAGUE

In association with wifa

THE BATTLE IS HEATING UP. DON'T MISS THE ACTION!




Sixteen girls teams with fire in their bellies are going to compete for a spot in the semis. So come over, with your friends and family to cheer for these girls as they claim the beautiful game as their own. The best cheering squad stands to win exciting prizes.

There are lots of exciting workshops, zumba sessions, brazilian capoeira and football lessons through the day.

Supported by

MumbaiMirror
f/TheMumbaiMirror | /MumbaiMirror | www.mumbaimirror.com
I AM MUMBAI




कंबाटा प्रकरण

# तीन भाडेकरू कंपन्यांना दिलासा

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**


कंबाटा एव्हिएशन कंपनीच्या कामगारांच्या थकित देण्यांच्या प्रकरणात कंबाटा एव्हिएशनच्या मालमत्तेवर टाच आणण्याची प्रक्रिया राज्य सरकारला सुरू ठेवता येईल. परंतु, कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता संरक्षित भाडेकरूंना त्यांच्या कार्यालयांतून बाहेर काढू, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी दिले.

कंबाटा एव्हिएशन कंपनीच्या बाराशेहून अधिक कामगारांच्या वेतन व अन्य देण्यांपोटी कोट्यवधी रुपयांची वसुली करण्याच्या उद्देशाने मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयाने कंबाटा ट्रस्टच्या इमारतीला (इरॉस बिल्डिंग) टाळे ठोकल्याने ही कारवाई वादात सापडली होती. न्यायालयाने पूर्ण इमारतीचे सील काढण्याचे आदेश त्यावेळी दिले होते. यासंदर्भातील कंबाटा ट्रस्टची याचिका उच्च न्यायालयाच्या खंडपीठापुढे प्रलंबित आहे.

तथापि, या इमारतीत भाडेकरू असलेल्या गॅलॅक्सी एव्हिएशन कंपनी, बँक ऑफ इंडिया व युनायटेड इंडिया इन्शुरन्स या तिघांनीही उच्च न्यायालयात धाव घेतली होती आणि त्यांच्या याचिका न्या. के. के. तातेड यांच्यासमोर प्रलंबित होत्या. त्याविषयी बुधवारच्या सुनावणीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांतर्फे वकिलांनी माहिती दिली की, कंबाटा कंपनीने औद्योगिक न्यायालयाचा आदेश मानला नसल्याने न्यायालयाने आदेश काढला आणि त्याप्रमाणेच तहसीलदारांनी संपत्ती जप्त करण्याचे आदेश काढले. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार इमारतीतील सर्वच कार्यालयांचे सील आम्ही काढलेले आहेत. तथापि, कायद्यानुसार, संबंधित कंपनीची मालमत्ता जप्त करून ती विकण्याचा अधिकार आम्हाला असून आम्ही कायदेशीर प्रक्रियेचे पालन करून ती कारवाई करू, अशी हमीही वकिलांनी दिली. त्याचवेळी भाडेकरू कंपन्यांच्या वतीनेही आमच्या कार्यालयासंदर्भात कोणा त्रयस्थाचे हक्क निर्माण करणार नसल्याची हमी देण्यात आली. त्यामुळे न्यायमूर्तींनी हे सर्व नोंदीवर घेऊन आदेश देत तिन्ही याचिका निकाली काढल्या.

### सर्वाधिक वाचलेली बातमी

कोहलीच्या उत्तरानं सगळेच गप्प!



**टी-२० मालिकेतील खराब फॉर्मबद्दल प्रश्न विचारणाऱ्या पत्रकाराला विराटनं असं काही उत्तर दिलं की तो निरुत्तरच झाला.**

मटा ॲप डाऊनलोड करा
app.mtmobile.in
मिस्ड् कॉल द्या
1800-103-8973

### तडका

शाळेच्या परीक्षा टी२०सारख्या असतील तर...
परीक्षा १ तास २० मिनिटांची असली पाहिजे..
दर २० मिनिटांनंतर विद्यार्थ्यांना आपापसात बोलण्याकरता २ मिनिटांचा टाइम ऑफ असला पाहिजे.
पहिली ३० मिनिटं पॉवरप्ले असला पाहिजे, ज्यात शिक्षक वर्गाबाहेर असतील.
एक प्रश्न फ्री हिट असला पाहिजे.
जे काही उत्तर लिहिले असेल, त्याला पूर्ण मार्क मिळाले पाहिजेत.

---

Pidilite PIDILITE INDUSTRIES LIMITED

FEVICOL | DR. FIXIT WATERPROOFING EXPERT | ONE DROP INSTANT ADHESIVE Fevi kwik | m-seal | fevi stik super

**EXTRACT OF STANDALONE AND CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED 31.12.2016**

(₹ In crores)

| Sr. No. | Particulars | Standalone Quarter ended 31.12.2016 (Unaudited) | Standalone Quarter ended 31.12.2015 (Unaudited) | Standalone Nine Months ended 31.12.2016 (Unaudited) | Standalone Nine Months ended 31.12.2015 (Unaudited) | Consolidated Quarter ended 31.12.2016 (Unaudited) | Consolidated Quarter ended 31.12.2015 (Unaudited) | Consolidated Nine Months ended 31.12.2016 (Unaudited) | Consolidated Nine Months ended 31.12.2015 (Unaudited) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations | 1,242.25 | 1,262.42 | 4,059.85 | 3,899.75 | 1,437.17 | 1,426.21 | 4,657.99 | 4,386.77 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax and Exceptional items) | 280.06 | 277.72 | 980.74 | 872.83 | 281.36 | 281.33 | 990.96 | 903.58 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional items) | 280.06 | 277.72 | 980.74 | 872.83 | 281.36 | 281.33 | 990.96 | 903.58 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional items) | 204.25 | 198.08 | 702.79 | 617.66 | 202.61 | 199.21 | 705.99 | 638.13 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 201.78 | 198.04 | 700.13 | 617.45 | 200.14 | 199.17 | 703.33 | 637.92 |
| 6 | Equity Share Capital | 51.27 | 51.27 | 51.27 | 51.27 | 51.27 | 51.27 | 51.27 | 51.27 |
| 7 | Earnings Per Share (of ₹ 1/- each ) | | | | | | | | |
| | Basic: | @ 3.98 | @ 3.86 | @ 13.71 | @ 12.05 | @ 3.95 | @ 3.86 | @ 13.71 | @ 12.37 |
| | Diluted: | @ 3.98 | @ 3.86 | @ 13.70 | @ 12.04 | @ 3.95 | @ 3.86 | @ 13.71 | @ 12.36 |

@ For the period only and not annualised.

**Note:**

The above is an extract of the detailed format of Quarter and Nine months ended Unaudited Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Unaudited Financial Results are available on the Stock Exchange websites (www.nseindia.com and www.bseindia.com) and on company's website www.pidilite.com

Place : Mumbai
Date : 1st February, 2017

**Bharat Puri**
**Managing Director**

**Regd. Office:** 7th Floor, Regent Chambers, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai - 400 021.
**Tel No.:** 91 22 2835 7000 **Fax:** 91 22 2835 6007 **Email address:** investor.relations@pidilite.co.in **Website:** www.pidilite.com **CIN:** L24100MH1969PLC014336